प्रेस नोट दिनांक :- २२/०८/२०२६

# साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.१४१/१९८५ कलम ३०२ भादवि, मधील मागील ४० वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीतास अटक केलेबाबत.

साकीनाका पोलीस ठाणे गु.र.क्र.१४१/१९८५ कलम ३०२ भादवि या गुन्हयाचे सेशन केस क्र. ६७०/१९८६ मध्ये पाहिजे आरोपी नामे सुरेश चंदर अडागळे, वय १९ वर्षे, हा जामिनावर असताना मा. सत्र न्यायालय,मुंबई येथे न्यायालयीन सुनावणीकरीता हजर राहत नसल्याने आरोपीविरूध्द अजामिनपात्र वॉरंट, जाहीरनामा वॉरंट जारी केले होते. त्याची बजावणीकरीता साकीनाका पोलीस ठाणे,मुंबई येथील पाहिजे/फरार आरोपी शोध पथकाने वांरवार शोध घेतला असता, सदरचा आरोपी मिळुन आला नाही. त्यामुळे मा. सत्र न्यायालय, मुंबई यांनी नमुद आरोपीताविरूध्द स्टॅडींग अजामिपात्र वॉरंट **( TOP PRIORITY ) जारी केले होते.**

त्याअनुषंगाने साकीनाका पोलीस ठाणेचे पाहिजे/फरार आरोपी शोध पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वर नमुद गुन्हयातील आरोपीताचा तांत्रिक व गुप्त बातमीदारामार्फतीने शोध घेतला असता, नमुद आरोपी हा त्याची ओळख लपवुन रांजणगाव, ता.शिरूर, जिल्हा-पुणे या परीतसरात राहवयास असल्याबाबत गुप्त माहिती प्राप्त करण्यात आली. दिनांक २०/०८/२०२६ रोजी साकीनाका पोलीस ठाणेतील फरार/पाहिजे पथकाकडुन गुन्हयातील आरोपीतास पकडण्यासाठी त्याचे नमुद नवीन पत्त्यावर सापळा रचला असता, सदर स्टॅडींग अजामिपात्र वॉरंट **( TOP PRIORITY )** मधील आरोपी नामे सुरेश चंदर अडागळे, वय ५९ वर्षे, हा मिळुन आल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

**तरी वर नमुद आरोपीत इसम हा नमुद गुन्ह्यात मागील ४० वर्षापासुन फरार/पाहिजे आरोपी असुन त्यास नमुद गुन्हयात अटक करून तसेच गुन्हा उघडकीस आणण्याची उल्लेखनीय कामगिरी साकीनाका पोलीस ठाणेचे फरार/पाहिजे पथकातील अंमलदार यांनी पार पाडली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बुहन्मुंबई श्री. देवेन भारती सो, मा. पोलीस सह आयुक्त (का.व सु.), बुहन्मुंबई डॉ.श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, डॉ.श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ-०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे, सहायक पोलीस आयुक्त साकीनाका विभाग, श्री. दादासाहेब घुटूकडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश मांदळे यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली पो.उप निरीक्षक प्रविण शिरसाट, पोहक्र. ९७०४९६/नंदकिशोर सांडव, पोहक्र.१०५५/अविनाश होळकर, पोशिक्र. १४००११/भुषण देवरे, पोशिक्र.१४०५७९/जालिदंर बागलाने व पोहक्र. ०६.०६९०/विशाल पिसाळ (तांत्रिक मदत ) यांनी पार पाडलेली आहे.